# महाराष्ट्र शासन

संचालनालय मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
-०२२,२७५७१३११.
:- ०२२,२७५७१३११.
E.Mail:- calfak6@yahoo.com

क्र.स्था.१८/ब/ग्रा.पं.ले.प/अभिलेख/ दिनांक २०।३।०९

विषय:- ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास करावयाची कार्यवाही.

कार्यालयीन आदेश क्र. ९ दिनांक २०।३।०९

ग्राम पंचायत लेखापरीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध न झाल्यास करावयाच्या कार्यवाही बाबत कार्यालयीन आदेश क्र. ९० दिनांक २७.७.२००६ अन्वये दिलेल्या सूचना मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) लेखा परिक्षणासाठी ग्रामपंचायत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास कार्यालयीन आदेश क्र.९० नुसार ग्रामपंचायतीच्या त्या विवक्षित कालावधीतील लेखापरीक्षण (घटक) कायम स्वरुपी कमी न करता ते तात्पुरत्या स्वरुपात कमी करण्यात यावे. अशा ग्राम पंचायतीचे लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न झाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या जबाबदारीवर प्रलंबित लेखापरीक्षण (घटक) म्हणून त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत नोंदवून प्रत्येक जिल्हयामध्ये जुलै २००६ पासूनच्या अशा सर्व लेखापरीक्षणाबाबतच्या नोंदी खालील नमुन्यात ठेवण्यात याव्यात (प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र)

| अ. क्र. | तालुका | ग्राम पंचायतीचे नांव | ग्राम पंचायतीचे उत्पन्न | अभिलेखे उपलब्ध न झालेला कालावधी | ले.प. साठी भेटीचा दिनांक | लेखा परीक्षकाचे नांव | अभिलेख अनुपलब्धते बाबत दिलेल्या अहवालाचा जावक क्र व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

अशा प्रलंबित लेखापरीक्षणाचे अभिलेख जिल्हा परिषदेने नंतर उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे लेखापरीक्षणासाठी मुख्य लेखापरीक्षकांची मान्यता घेण्याची यापुढे आवश्यकता नाही. ही मान्यता या पुढे उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) यांनी ग्रामपंचायतीचे अभिलेख उपलब्ध असल्याची खात्री करुन द्यावी. नंतर अशा दिलेल्या मान्यतेच्या प्रकरणांची यादी मुख्य लेखापरीक्षक कार्यालयास दरमहा लगत नंतरच्या महिन्यातील १० तारखेपर्यंत निश्चितपणे सादर करण्याची दक्षता घ्यावी.